# महाराष्ट्र शासन
# मृद व जलसंधारण विभाग
# शासकीय निर्लेखित वाहनांची विक्री करावयाची
# जाहिरात क्र. १ (दुसरी फेरी) सन २०१८-१९

खालील प्रमाणे नमुद केलेल्या या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील उपविभागीय कार्यालयाकडे असलेल्या शासकिय निरुपयोगी निर्लेखित केलेल्या वाहनाची विक्री करणेसाठी या कार्यालयाकडून दरपत्रकाव्दारे बंद लखोटयातून खरेदीचे दर मागविण्यात येत आहेत. त्याबाबतची सर्व माहिती खालील तक्त्यात नमुद केलेली आहे. दरपत्रके संबंधीत कार्यालयात दि. ४/०६/२०१९ ते १३/०६/२०१९ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सार्वजनिक सुट्ट्या वगळून जमा करणेत यावेत. सदरची दरपत्रके नेमलेल्या समिती समोर उघडण्यात येतील तसेच प्राप्त दरपत्रके कोणतेही कारणे न देता नाकारण्याचा अधिकार मा. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे.

## वाहनांची माहिती ठिकाण दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | वाहन प्रकार | वाहनाची स्थिती | ठिकाण | इतर |
|---|---|---|---|---|
| १ | महिंद्रा डिझेल जीप एमएच ०४- अेअेन १७० बनावट सन १९९९ | बंद स्थितीत व पूर्ण गंजलेल्या स्थितीत | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग आंबडपाल. | |

वरील प्रमाणे निरुपयोगी वाहनांची संख्या १

**अटी व शर्ती**

१) वर दर्शविलेले शासकिय वाहन पूर्ण स्थितीत निरुपयोगी असून निर्लेखित आहेत.

२) दरपत्रकातील दर हे वाहनाची दिलेल्या स्थितीप्रमाणे देण्यात यावेत.

३) दरपत्रकामध्ये ज्या एजन्सीचे दर जादा असतील त्यांचेच दर मंजूर केले जातील.

४) बंद लेखाटयातील दरपत्रक वरील तक्त्यामध्ये दर्शविलेलेल्या ठिकाणी अथवा या विभागीय कार्यालयाकडे दिनांक १३/०६/२०१९ पर्यत पोष्टाने अथवा हस्ते पोहोच करावे. या दिनांका नंतर आलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत. पोस्टाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

५) दरपत्रकामध्ये दर देताना प्रत्येकी वाहनाचे स्वतंत्र्य दर नमुद करावेत व बंद लखोटयावर नांव, पत्ता, व विषय व्यवस्थित नमुद करावा.

६) दरपत्रकामधील आपले दर मंजूर करण्याचे वा नाकारण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेले आहेत.

७) दरपत्रकातील दर मंजूर झालेवर त्याची मंजूरीची रक्कम ७ दिवसात या विभागाकडील लेखा परिक्षकाकडे भरणा करावयाची आहे.

८) दरपत्रकातील मंजूर रक्कम भरणा केलेवरच साहित्य ताब्यात देण्याची कार्यवाही भांडार शाखे मार्फत केली जाईल.

९) साहित्य उचल आपण स्वत: स्वखर्चाने करावयाची आहे याची नोंद घ्यावी.

१०) वाहन ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत ताब्यात दिले जाईल.

११) साहित्य ताब्यात घेताना मंजुर रक्कमेवर शासन प्रचलित नियमानुसार देय होणारी GST रक्कम मंजुर रक्कमेबरोबर भरणा करावी लागेल याची नोंद घ्यावी.

१२) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग (को.प्र.), अलोरे, ता. चिपळुण या कार्यालयाने वाहनाच्या ठरवुन दिलेल्या रक्कमेपेक्षा जादा रक्कम असलेली दरपत्रके मंजुर केली जातील याची नोंद घ्यावी.

जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग,
रत्नागिरी

जा.क्र./जिजअ/मृवज/विर/लेशा/का-११/ १३५६
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग,
रत्नागिरी यांचे कार्यालय
दिनांक :- २८/०५/२०१८

**प्रत** :- मा. अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यावाहीसाठी सविनय सादर.

२/- सदरची शासकीय निर्लेखित वाहनाची विक्री करावयाची जाहिरातीची सुचना आपल्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी हि विनंती

**प्रत** :- मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यावाहीसाठी सविनय सादर.

२/- सदरची शासकीय निर्लेखित वाहनाची विक्री करावयाची जाहिरातीची सुचना आपल्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी हि विनंती

**प्रत** :- उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, आंबडपाल यांना माहितीसाठी रवाना.

२/ आपल्या उपविभागीय कार्यालयाकडील निर्लेखित केलेल्या वाहनाची दरपत्रकाद्वारे विक्री करावयाची असल्याने जाहिरातीमध्ये नमुद केले प्रमाणे विक्री घेवू इच्छिणाऱ्या एजन्सीने मागणी केल्यास वाहन प्रत्यक्षात दाखविणेत यावीत व त्या एजन्सीची दरपत्रके बंद लखोटयातील स्वीकारावीत व सदर बंद लखोटे विभागीय कार्यालयाकडे परस्पर जमा करावेत. तसेच जाहिरात नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.

**प्रत** :- भांडार शाखा (विभागीय कार्यालय)

**प्रत** :- विभागीय कार्यालय नोटीस बोर्ड